असा. क्र. ४१ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**मंगळवार, ऑगस्ट १, २००६/श्रावण १०, शके १९२८**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम**

**अनुक्रमणिका**

पृष्ठे

**सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१.**—महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम . . . . **२८५-२८८**

दिनांक २९ जुलै २००६ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **“ महाराष्ट्र शासन राजपत्रात ”** दिनांक १ ऑगस्ट २००६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.).

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्तावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :— (१९६५ चा महा. ४०.)

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २००६ असे म्हणावे. (संक्षिप्त नाव व प्रारंभ.)



 [ **किंमत :** रुपये ९.०० ]

(२) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येईल.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे), याच्या कलम २ मध्ये,— १९६५ चा महा. ४०.

(क) खंड (७) मध्ये,—

(एक) " आणि थेट निवडून आलेला अध्यक्ष " हा मजकूर वगळण्यात येईल ;

(दोन) उप खंड (दोन) ऐवजी, पुढील उप खंड दाखल करण्यात येईल :—

" (दोन) परिषदेचा अध्यक्ष म्हणून किंवा परिषदेच्या कोणत्याही समितीचा सभापती म्हणून निवडून येण्याचा, " ;

(ख) खंड (१२) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

" (१२) " निवडणूक " याचा अर्थ, नगरपरिषदेची निवडणूक असा आहे व त्यात कोणत्याही पोट-निवडणुकीचा समावेश होतो ; ".

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ९ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ९ मधील, पोट-कलम (१), खंड (अ) मध्ये " अध्यक्ष व " हा मजकूर वगळण्यात येईल.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ५१ ऐवजी नवीन कलम दाखल करणे.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५१ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :---

अध्यक्षाची निवडणूक.

" **५१.** (१) कलम ५१-१अ च्या तरतुदींना अधीन राहून, प्रत्येक नगरपरिषदेचा एक अध्यक्ष असेल व तो निवडून आलेल्या परिषद सदस्यांकडून त्यांच्यामधून निवडण्यात येईल.

(२) नगरपरिषदेवर निवडून आलेल्या परिषद सदस्यांची नावे कलम १९ च्या पोट-कलम (१) अन्वये, **राजपत्रात** ज्या दिनांकास प्रसिद्ध करण्यात येतील किंवा, यथास्थिति, प्रथम प्रसिद्ध करण्यात येतील, त्या दिनांकापासून पंचवीस दिवसांच्या आत, जिल्हाधिकारी, अध्यक्षाला निवडून देण्यासाठी परिषद सदस्यांची एक विशेष सभा बोलावील :

परंतु, या कलमाखालील अशी सभा, मावळत्या परिषद सदस्यांचा पदावधी संपण्यापूर्वी घेता येणार नाही.

(३) पोट-कलम (२) अन्वये बोलावण्यात आलेल्या सभेच्या अध्यक्षपदी जिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकारी याबाबत लेखी आदेशाद्वारे नेमील असा अधिकारी असेल. जिल्हाधिकारी किंवा असा अधिकारी जेव्हा अशा सभेच्या अध्यक्षपदी असेल तेव्हा, त्याला नगर परिषदेच्या अध्यक्षाला नगरपरिषदेच्या सभेच्या अध्यक्षपदी असताना जे अधिकार असतात तेच अधिकार असतील, परंतु त्यास मतदानाचा हक्क असणार नाही :

परंतु, सभेतील कार्यपद्धतीचे (सभेसाठी आवश्यक असणाऱ्या गणपूर्तीसह) विनियमन करण्यासाठी या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी अशा सभेच्या अध्यक्षपदी असणाऱ्या जिल्हाधिकाऱ्यास किंवा अधिकाऱ्यास त्याच्या मते पुरेशी असतील अशा कारणांवरून, अशी सभा स्थगित करण्यास नकार देता येईल.

(४) कोणतेही नामनिर्देशनपत्र स्वीकारण्यासंबंधीच्या किंवा नाकारण्यासंबंधीच्या जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा अशा अधिकाऱ्याच्या कोणत्याही निर्णयामुळे बाधित झालेल्या कोणत्याही परिषद सदस्यास असा निर्णय कळवल्यापासून अठ्ठेचाळीस तासांच्या आत, संबंधित प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन यांच्याकडे अपील सादर करता येईल आणि त्याच वेळी त्यास, अशा अपिलाची नोटीस जिल्हाधिकाऱ्यास किंवा अशा अधिकाऱ्यास देता येईल. संबंधित पक्षांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, प्रादेशिक संचालक शक्य असेल तितक्या शीघ्रतेने असे अपील निकालात काढील. प्रादेशिक संचालकाचा अशा अपिलावरील निर्णय आणि केवळ अशा निर्णयास (कोणताही असल्यास) अधीन राहून, जिल्हाधिकाऱ्याचा किंवा, यथास्थिति, अशा अधिकाऱ्याचा, उमेदवाराचे नामनिर्देशन स्वीकृत किंवा अस्वीकृत करण्यासंबंधीचा निर्णय अंतिम व निर्णायक असेल आणि त्यावर कोणत्याही न्यायालयात आक्षेप घेता येणार नाही.

(५) अध्यक्षाच्या निवडणुकीत जर समसमान मते पडली तर, निवडणुकीचा निकाल चिठ्ठ्या टाकून करण्यात येईल व चिठ्ठ्या टाकण्याचे काम जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा पीठासीन अधिकाऱ्याच्या उपस्थितीत, तो ठरवील अशा रीतीने करण्यात येईल.

(६) अध्यक्षाच्या निवडणुकीबाबतचा कोणताही वाद राज्य शासनाकडे विचारार्थ पाठविण्यात येईल व त्याचा त्यावरील निर्णय अंतिम असेल.

(७) अध्यक्षाच्या निवडणुकीनंतर, परिषद सदस्यास नामनिर्देशन स्वीकृत करण्याच्या प्रयोजनासाठी नगरपरिषद आपली सभा चालू ठेवील.

(८) परिषद सदस्यांचे नामनिर्देशन विहित रीतीने करण्यात येईल.

(९) जर अध्यक्षाचे पद कोणत्याही कारणाने रिक्त झाले असेल तर, अध्यक्षाच्या नंतरच्या निवडणुकीकरिता, पोट-कलमे (२) ते (६) (दोन्ही धरून) यात ठरवून दिलेली कार्यपद्धती लागू होईल, मात्र पद रिकामे झाल्याच्या दिनांकापासून पंचवीस दिवसांच्या आत, जिल्हाधिकारी विशेष सभा बोलावील.".

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ५५ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५५ मध्ये, पोट-कलम (१) च्या परंतुकाऐवजी पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :—

" परंतु,—

(क) अध्यक्षाच्या निवडणुकीच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या कालावधीत ; आणि

(ख) जर नगरपरिषदेचा कालावधी, सहा महिन्यांच्या आत समाप्त होत असेल तर,

असा कोणताही ठराव मांडता येणार नाही.".

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० यामध्ये कलम ५५क समाविष्ट करणे.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५५ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

परिषद सदस्यांनी थेट निवडून आलेल्या अध्यक्षाला पदावरून दूर करणे.

" **५५क.** या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २००६ याच्या प्रारंभाच्या लगतपूर्वीच्या दिनांकास, परिषद सदस्यांनी थेट निवडून आलेल्या अध्यक्षाला पदावरून दूर करण्याच्या संबंधात कलम ५५ च्या तरतुदी जशा लागू होत्या तशाच लागू राहतील.". २००६ चा महा. ३१.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

असा. क्र. ४७ रजिस्टर्ड नं.एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८


# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**सोमवार, सप्टेंबर ११, २००६/भाद्र २०, शके १९२८**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**


## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

### शुद्धिपत्र

**महाराष्ट्र शासन राजपत्र,** असाधारण, भाग चार, दिनांक १ ऑगस्ट २००६, पृष्ठ क्रमांक २८५ ते २८८ वर प्रकाशित करण्यात आलेल्या महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २००६ (२००६ चा महा. ३१) मध्ये, पृष्ठ २८८ वर, ओळ क्रमांक ८ मध्ये, '' **५५क.** '' **या ऐवजी** '' **५५-१.** '' **असे वाचावे.**



शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई